




दैनिक **मराठवाडा पत्र**

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २६३ ●सोमवार,दि.२२ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955









# बीडमध्ये क्षीरसागर बंधूंना धक्का; राष्ट्रवादीच्या प्रेमलता पारवे नगराध्यक्षपदी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत आजपर्यंतचा सर्वात मोठा राजकीय चमत्कार पाहायला मिळाला आहे. मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर असलेली क्षीरसागर घराण्याची एकहाती सत्ता बीडच्या मतदारांनी दूर सारली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार प्रेमलता पारवे यांनी ३,७७९ मतांनी विजय मिळवत नगराध्यक्ष पदावर नाव कोरले. क्षीरसागर घराण्याने ठरवलेल्याउमेदवारा व्यतिरिक्त नगराध्यक्ष झाल्याने ऐनवेळी भाजपत ▶ उर्वरित पान २ वर

### ● अमरसिंह पंडितांचा 'बीड' पॅटर्न यशस्वी

**माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी गेवराईत आपला गड गमावला असला तरी, बीडमध्ये मात्र त्यांनी विजयाची गणिते अचूक जुळवली. प्रेमलता पारवे यांच्या पाठीशी आपली संपूर्ण यंत्रणा उभी करून त्यांनी क्षीरसागरांच्या वर्चस्वाला सुरुंग लावला.**

### ● क्षीरसागर बंधूंना दणका

**डॉ. भारतभूषण क्षीरसागर आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांची नगरपालिकेतील मक्तेदारी संपवण्यासाठी बीडकरांनी यावेळी परिवर्तनाचा पवित्रा घेतला होता. डॉ. योगेश क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून 'संजीवनी' मिळवण्याचा प्रयत्न केला, मात्र मतदारांनी त्यांना नाकारले. दुसरीकडे, आमदार संदीप क्षीरसागर यांनी पूर्ण ताकद लावूनही त्यांची यंत्रणा कमी पडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**

### ● नगरसेवक पदाचे पक्षनिहाय बलाबल :

राष्ट्रवादी (अजित पवार गट) : १८ भाजप: १४, राष्ट्रवादी (शरद पवार गट) : ११, शिवसेना (शिंदे गट) : ०३, शिवसेना (ठाकरे गट): ०१ एमआयएम ०२, काँग्रेस: ०१

# परळीत धनु भाऊ - पंकजाताईंचा एकहाती विजय...!

## माय बाप जनतेचे अनेक अनेक आभार : धनंजय मुंडे

- ▸ परळीतील संपूर्ण महायुतीचा प्रयोग आगामी निवडणुकीत देखील कायम राहील: पंकजाताईंचे सुतोवाच
- ▸ नगराध्यक्ष पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी १५,६६४ मतांच्या लीडने विजयी
- ▸ ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी, ६ अपक्ष, तर तुतारी गटास केवळ दोन जागा
- ▸ संध्याताई देशमुख यांच्या सह दीपक देशमुख यांचाही दारुन पराभव
- ▸ पंकजाताईंसमवेत धनु भाऊंनी विजयी जल्लोष केला साजरा
- ▸ निवडून आलेले सहा अपक्ष महायुतीतल बंडखोर, सर्वच पाठिंबा देणार

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी नगर परिषदेच्या निवडणुकीत धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे या बहीण भावांनी मिळून महायुतीच्या माध्यमातून पुन्हा एकदा एकहाती विजय मिळवत, नगरपरिषदेसह मतदारसंघात आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या तब्बल १५ हजार ६६४ मतांनी विजयी झाल्या आहेत.

दरम्यान परळीतील ३५ पैकी २५ जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले असून सहा जागांवरती महायुतीतील बंडखोर असलेले सहा उमेदवार अपक्ष निवडून आले असून, या सहापैकी पाच उमेदवारांनी महायुतीच्या पॅनलला निकाला दिवशीच पाठिंबा दिला आहे; तर उर्वरित एक उमेदवार ही लवकरच पाठिंबा देणार असल्याचे कळते.

दुसरीकडे तुतारी गटाला केवळ दोन जागांवर विजय प्राप्त करता आला असून, पॅनल प्रमुख दीपक देशमुख यांचा वार्ड क्रमांक सहा मध्ये दारून पराभव झाला आहे. दरम्यान धनंजय मुंडे यांनी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या यश:श्री निवासस्थानी जाऊन पंकजाताईंना शुभेच्छा देत विजयी जल्लोष साजरा केला.



परळीच्या जनतेने आम्हाला वेळोवेळी आशीर्वाद दिले, मात्र मागील काही दिवसांमध्ये परळीच्या मातीची आणि इथल्या माणसांची जी बदनामी राजकीय द्वेषातून केली जात होती, त्याला आज परळीच्या जनतेने मतांमधून उत्तर दिले असल्याचे वक्तव्य धनंजय मुंडे यांनी केले आहे. तर पंकजाताई मुंडे यांनी देखील महाराष्ट्रातील क्वचितच घडलेला संपूर्ण महायुतीचा हा परळी येथील प्रयोग यशस्वी ठरला असून ▶ उर्वरित पान २ वर

**● खा. बजरंग सोनवणे यांचा परळीतील दीर्घ मुक्काम वाया**

**● परळीत मुंडे बहीण भावाला टक्कर देऊन पराभव करून दाखवतो म्हणणारे तुतारी गटाचे सर्वच नेते तोंडघशी**

**● परळी व्यतिरिक्त धनंजय मुंडे यांनी लक्ष घातलेल्या गंगाखेड नगर परिषद निवडणुकीत देखील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तथा मुंडेंच्या भगिनी सौ. उर्मिलाताई मधुसूदन केंद्रे विजयी**

**● दीपक देशमुख यांचा प्रभाग क्रमांक ६ मधून ७०० पेक्षा अधिक मतांनी दारून पराभव**

## महाराष्ट्रातील विजयी नगराध्यक्षांची यादी




**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांचा निकाल आज जाहीर होत आहे. आज एकूण २८७ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी) मतमोजणी होईल. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. त्यानंतर निकालाचे एक-एक कल हाती येण्यास सुरुवात झाली आहे. या निवडणुकीत नगरसेवकांबरोबरच कोणत्या पक्षाचे किती नगराध्यक्ष निवडून येणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते.

**● विजयी नगराध्यक्षांची यादी खालीलप्रमाणे**

चंदगड नगरपंचायत- सुनील कावनेकर (भाजप)
अनगर नगरपंचायत- प्राजक्ता पाटील (भाजप)
जामनेर नगरपरिषद- साधना महाजन (भाजप)
दोंडाईचा नगरपरिषद- नयनकुमार रावल (भाजप) ▶ उर्वरित पान२

# परळी नगर पालिकेत शिवसेनेने गड राखला

## दोन उमेदवार विजयी करत जिल्हाप्रमुख मुळूक यांची रणनीती यशस्वी

**बीड । प्रतिनिधी**

परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेने राजकीय ताकद दाखवत आपला गड पुन्हा एकदा अभेद्य राखला आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी नेतृत्व सिध्द करत दोन उमेदवारांना विजयी करून शिवसेनेचा परळीतील दबदबा कायम असल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे सचिव संजय मोरे साहेब व संपर्क प्रमुख मनोज शिंदे यांच्या आदेशानुसार, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, बापूसाहेब मोरे व टी. पी. मुंडे यांच्या



मार्गदर्शनाखाली ही निवडणूक लढविण्यात आली. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी परळी पालिका ▶ उर्वरित पान २ वर

### ● शिवसेनेच्या शिंदेंकडून माजी नगराध्यक्ष देशमुख यांचा पराभव

**राज्याचे लक्ष लागलेल्या परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेचे उमेदवार व्यंकटेश शिंदे यांनी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांचा ८३० मतांनी पराभव केला. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आलेल्या या निवडणुकीत मिळालेल्या विजयामुळे परळीतील राजकीय समीकरणे शिवसेनेच्या बाजूने झुकली असून, शिवसेनेचा दबदबा अधिक झाला आहे.**

## लोकनेते विनायकराव मेटे यांचे स्वप्न पूर्ण झाले : डॉ ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी, शिवसेना, शिवसंग्राम युतीच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांच्या विजयासाठी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली शिवसंग्रामने प्रयत्नात कोणतीही कसूर सोडली नाही. परिणामी आज प्रेमलता पारवे यांचा विजय झाला आणि त्या रूपाने लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. अशी प्रतिक्रिया शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी दिली आहे.

# धारूर नगरपरिषद निवडणुकीत भाजपाचा सुपडा साफ

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या ताब्यात नगरपरिषदेच्या चाव्या ; आ. प्रकाश सोळंके यांचे वर्चस्व सिद्ध



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या १० प्रभागातील २० जागांचा तसेच अध्यक्षपदाचा निकाल जाहीर झाला असून धारूर नगर परिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वर्चस्व राहिले आहे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब रामराव जाधव हे ६६६ मतांनी विजयी झाले आहेत.

धारूर नगर परिषदेच्या दहा प्रभागातील २० नगरसेवक पदांचा निकालही जाहीर झाला आहे यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित पवार गट ११, भारतीय जनता पार्टी भाजपा ६ तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट तीन जागांवर ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये पहिल्यांदाच भाजपचे 15 नगरसेवक विजयी

## नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा निसटता पराभव

**बीड । प्रतिनिधी**



बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने ऐतिहासिक यश संपादन करत शहराच्या राजकारणात आपली ताकद दाखवून दिली आहे. बीड नगरपरिषदेच्या एकूण ५२ जागांपैकी भाजपचे तब्बल १५ नगरसेवक विजयी झाले असून, बीडच्या इतिहासात प्रथमच भाजपने एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवक निवडून आणण्याची कामगिरी केली आहे. यापूर्वी भाजपचा केवळ एक नगरसेवक असायचा. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे यांचा मात्र निसटता पराभव झाला. नगराध्यक्ष पदासाठी भाजपच्या उमेदवार डॉ. ज्योती घुंबरे यांनी अत्यंत चुरशीची व अटीतटीची लढत दिली. मात्र, शेवटच्या टप्प्यात अतिशय कमी मतांनी त्यांचा निसटता पराभव झाला. या निवडणुकीत डॉ.घुंबरे यांना ३२ हजार ३३ मते मिळाली असून, हा वाढता जनाधार भाजपसाठी भविष्यात निश्चितच बळ देणारा आहे, असे पक्षाच्यावतीने सांगण्यात आले. बीड नगरपरिषदेची निवडणूक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर डॉ.क्षीरसागर यांनी भाजपमध्ये प्रवेश करून निवडणुकीची जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना खंबीर साथ देत जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निवडणुकीत परिश्रम घेतले.

### ● भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे

**प्रभाग क्र. २ मधून शुभम दिलीप धूत, सावित्री नितीन साखरे, ४ मधून मीनाताई जाधव, ५ मधून मीना रणजितसिंह चव्हाण, ७ मधून भाग्यश्री देशपांडे, जगदीश गुरखदे, ८ मधून राहुल गुरखुदे, १० मधून मंगेश धोंगडे, भाग्यश्री तांबारे, १२ मधून पूजा राजाभाऊ गुजर, १३ मधून समीक्षा शेटे, सय्यद मुस्तफा, १५ मधून डॉ.सारिका क्षीरसागर, आदित्य माने, २५ मधून ज्योती नंदकिशोर पिंगळे अशी भाजपच्या विजयी नगरसेवकांची नावे आहेत.**

### ● भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक सय्यद मुस्तफा ; शुभम धूत सर्वाधिक मतांनी विजयी

**स्व.गोपीनाथराव मुंडे यांना मानणारे आणि भाजपचे नगरसेवक पदाचे उमेदवार मुस्तफा सय्यद यांचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला आहे. त्यांच्या रूपाने बीडमध्ये भाजपचा पहिला मुस्लिम नगरसेवक झाला. तसेच, शुभम धूत हे सर्वाधिक १५८४ मतांनी विजयी झाले आहेत.**

### ● प्रचंड विरोधानंतरही डॉ.सारिकाताई क्षीरसागर विजयी

**बीडमधील प्रभाग क्र.१५ च्या उमेदवार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांना विरोधकांनी प्रचंड विरोध केला. अक्षरश: विरोधक याच प्रभागामध्ये तळ ठोकून होते. तरीही डॉ.सारिकाताई ह्या ७९६ मतांनी विजयी झाल्या. त्यानंतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी क्षीरसागर निवासस्थानी गुलाल उधळून जल्लोष केला.**

### ● माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही: डॉ.योगेश क्षीरसागर

**बीडकरांनी निवडून दिलेल्या भाजपच्या विजयी १५ नगरसेवकांचे अभिनंदन करतो. आगामी काळात पक्षाचे संघटन वाढवून पुन्हा जनतेत जाऊ. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, पक्ष वाढीसाठी परिश्रम घेईल, असा शब्द डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिला.**







# महाविस्तार ए आय – शेतकऱ्याच्या हाती आलेली डिजिटल शेतीची नवी वाट




शेती ही केवळ पिकांची गणितं नाहीत, तर ती निसर्गाशी चाललेली अखंड चर्चा आहे. माती, पाऊस, ऊन, वारा आणि माणसाचे कष्ट – या सगळ्यांच्या संयोगातून शेती उभी राहते. शेतकरी दररोज शिवारात उभा राहून आकाशाकडे पाहतो, माती हातात घेतो आणि मनाशी म्हणतो – यंदा पीक हातात येईल का ? पण कधी पावसाचा अंदाज चुकतो, कधी बाजारभाव कोसळतात, तर कधी एखादा रोग किंवा किडीचा प्रादुर्भाव सगळे स्वप्न उधळून लावतो. अशा वेळी शेतकऱ्याचे घामाचे थेंब मातीमोल होतात.

शेतकरी राजा उगवतो पहाटे,
पिकासाठी वाहतो जीव ओठी

हीच व्यथा ओळखून, शेतकऱ्याच्या जगण्याला आधार देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने एक नवा डिजिटल हात पुढे केला आहे – महाविस्तार ए आय. हे केवळ मोबाईलवरील साधन नसून, शेतकऱ्याचा नवा डिजिटल सोबती, मार्गदर्शक आणि विश्वासाचा आधार आहे.

महाविस्तार ए आय म्हणजे आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पारंपरिक शेती यांचा सुंदर संगम. जिथे पूर्वी अनुभव, अंदाज आणि शेजाऱ्याचा सल्ला यावर शेती चालायची, तिथे आता अचूक माहिती, शास्त्रीय मार्गदर्शन आणि तंत्रज्ञानाचा आधार मिळतो. शेतीत शहाणपण पेरलं, तरच समृद्धी उगवते – या म्हणीला महाविस्तार ए आय नवा अर्थ देतो.

या सुविधेमधून शेतकऱ्याला पेरणीपासून काढणीपर्यंतची संपूर्ण माहिती एका ठिकाणी मिळते. कोणत्या पिकासाठी कोणती जमीन योग्य, किती बियाणे लागेल, खतांचे प्रमाण किती असावे, फवारणीची योग्य वेळ कोणती – या सगळ्याचा तपशील शेतकऱ्याच्या हातात येतो. त्यामुळे अंदाजावर चालणारी शेती न राहता माहितीवर आधारलेली शेती शक्य होते.

महाविस्तार ए आय मधील सर्वात उपयुक्त भाग म्हणजे ए आय आधारित स्वयंचलित सल्ला प्रणाली. ही प्रणाली शेतकऱ्याचा डिजिटल सल्लागार बनून काम करते.

आज फवारणी करावी का ?
या पिकावर कोणता रोग आहे ?
किती खत द्यावे ?
पाऊस येणार आहे का ?

असे प्रश्न शेतकरी थेट मराठीत विचारू शकतो आणि क्षणात उत्तर मिळते.

एक प्रश्न, एक उत्तर,
अज्ञानावर मात करून उभं राहतं शहाणपण

यामुळे चुकीच्या औषधांचा वापर टाळता येतो, खर्च कमी होतो आणि पिकांचे नुकसान थांबते. योग्य वेळी योग्य सल्ला – हेच शेतीचे खरे भांडवल हे महाविस्तार ए आय प्रत्यक्षात उतरवते.

महाविस्तार ए आय मधील ताज्या हवामान माहितीद्वारे शेतकऱ्याला आपल्या कामाचे नियोजन करता येते. पाऊस, गारपीट, थंडी किंवा उष्णतेचा अंदाज आधीच मिळाल्याने शेतकरी योग्य वेळी पेरणी, फवारणी किंवा काढणी करू शकतो. तसेच बाजार समितीनुसार दररोजचे बाजारभाव उपलब्ध असल्यामुळे शेतमाल विक्रीचा निर्णय अधिक शहाणपणाने घेता येतो.

भाव कळला, वेळ साधली,
मगच मळ्यात सोनं पेरली

या सुविधेमध्ये कृषी विभागाच्या विविध योजना, अनुदाने, मार्गदर्शक सूचना थेट उपलब्ध असल्यामुळे माहितीअभावी होणारे नुकसान टळते. कार्यालयाच्या फेऱ्या कमी होतात आणि शेतकऱ्याचा वेळ वाचतो. आजची शेती ही केवळ कष्टाची नाही, तर विचारांची आणि माहितीचीही आहे. बदलत्या काळात जो शेतकरी नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेतो, तोच टिकतो. महाविस्तार ए आय म्हणजे शेतकऱ्याला बदलत्या काळाशी पाऊल टाकायला शिकवणारा एक नवा प्रकाश आहे.

माती जुनी, हात जुने,
पण विचार नवे हवेत
तेव्हाच शेती फुलते,
तेव्हाच आयुष्य उजळते

महाविस्तार ए आय ही केवळ डिजिटल सुविधा नसून, शेतकऱ्याच्या स्वप्नांना बळ देणारी, शेतीला शाश्वत बनवणारी आणि ग्रामीण भारताला आत्मनिर्भरतेकडे नेणारी नवी वाट आहे. मातीशी नातं जपून, तंत्रज्ञानाचा आधार घेत, शेतकरी आता अधिक सक्षमपणे उभा राहत आहे – आणि त्याच्या हातात महाविस्तार ए आय चा विश्वास आहे.

– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

# गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की, ज्यांचे कार्य केवळ धार्मिक चौकटीत मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाच्या व्यापक प्रवाहाला दिशा देणारे ठरते. अशाच महान विभूतींपैकी एक म्हणजे गुरु गोविंद सिंह होय. शीख धर्माचे दहावे गुरु म्हणून त्यांची ओळख असली, तरी त्यांचे कार्य हे केवळ धर्मगुरुपदापुरते सीमित नव्हते. ते एक समाजसुधारक, न्यायासाठी लढणारे योद्धा, मानवी मूल्यांचे तत्त्वज्ञ आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य देणारे नेतृत्व होते. त्यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या सामाजिक कार्याचा वेध घेणे म्हणजे भारतीय समाजातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेच्या संघर्षाचा इतिहास समजून घेणे होय.

गुरु गोविंद सिंह यांचा काळ हा सामाजिक, धार्मिक आणि राजकीय अस्थैर्याचा होता. समाज जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, धार्मिक असहिष्णुता आणि सत्ताधारी वर्गाच्या अन्यायाने ग्रासलेला होता. सामान्य माणूस भयभीत जीवन जगत होता. धर्माचा वापर माणसामाणसांतील भेद वाढवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत गुरु गोविंद सिंह यांनी धर्माला सामाजिक न्यायाचे साधन बनवले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेली कृती होती. गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे खालसा पंथची स्थापना. ही घटना केवळ धार्मिक नव्हती, तर ती सामाजिक क्रांतीची सुरुवात होती. खालसा पंथाने जात, वर्ण, जन्माधारित श्रेष्ठत्व आणि सामाजिक भेदभाव यांना ठामपणे नाकारले. खालसा पंथात प्रवेश करताना सर्वांना समान ओळख देण्यात आली. सिंह आणि कौर ही नावे स्वीकारून स्त्री–पुरुषांना समान दर्जा देण्यात आला. या कृतीतून गुरु गोविंद सिंह यांनी स्पष्ट संदेश दिला की, मानवाची ओळख त्याच्या जन्मावर नाही, तर त्याच्या मूल्यांवर आणि कर्तृत्वावर आधारित असावी. स्त्री–पुरुष समानतेचा विचार गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्या काळात स्त्रीला समाजात दुय्यम स्थान दिले जात होते. अनेक अमानवी प्रथा आणि रूढी स्त्रीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा घालत होत्या. गुरु गोविंद सिंह यांनी या अन्यायकारक व्यवस्थेला विरोध केला. खालसा पंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सन्मान, अधिकार आणि जबाबदाऱ्या दिल्या. स्त्री ही दुर्बल नसून समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहे, असा विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून मांडला. त्यामुळेच शीख परंपरेत स्त्रीला आत्मसन्मानाचे स्थान मिळाले. गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक विचारात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाला अनन्यसाधारण महत्त्व होते. त्यांनी आपल्या अनुयायांना गुलामगिरीची मानसिकता झुगारून देण्याचा संदेश दिला. अन्याय सहन करणे हा धर्म नाही, तर अन्यायाला विरोध करणे हेच खरे धार्मिक कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी समाजात रुजवला. याच विचारातून संत–सिपाही ही संकल्पना पुढे आली. मनाने संत असावे, परंतु अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि शक्ती अंगी असावी, असा त्यांचा आग्रह होता. ही संकल्पना सामाजिक न्यायाच्या संघर्षाला नैतिक अधिष्ठान देणारी ठरली. धार्मिक सहिष्णुता आणि मानवता हा गुरु गोविंद सिंह यांच्या सामाजिक कार्याचा आत्मा होता. त्यांनी कोणत्याही एका धर्माला श्रेष्ठ मानले नाही, तर सर्व धर्मांचा आदर करण्याचा संदेश दिला. त्यांच्या लिखाणातून आणि उपदेशातून मानवतेचे सर्वोच्च मूल्य सतत अधोरेखित होते. देवपूजेपेक्षा मानवसेवा श्रेष्ठ आहे, हा विचार त्यांनी समाजात दृढ केला. त्यामुळे शीख धर्म हा केवळ धार्मिक पंथ न राहता मानवी मूल्यांवर आधारित सामाजिक चळवळ बनला.

गुरु गोविंद सिंह यांनी शिक्षण आणि विवेकशीलतेलाही सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन मानले. अंधश्रद्धा, रूढीवादी परंपरा आणि अज्ञान यांना त्यांनी समाजाच्या प्रगतीतील मोठे अडथळे मानले. त्यामुळे त्यांनी आपल्या अनुयायांना ज्ञानसंपन्न, विचारशील आणि प्रश्न विचारणारे बनवण्यावर भर दिला. शिक्षण हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाजाच्या नैतिक उन्नतीसाठी आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या विचारांमुळे समाजात विवेकवादी दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली. त्यांच्या सामाजिक कार्यात सेवा आणि त्यागाला अनन्यसाधारण स्थान होते. गुरु गोविंद सिंह यांचे संपूर्ण जीवनच त्यागाचे प्रतीक होते. त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे, पुत्रांचे बलिदान दिले, तरीही अन्यायापुढे झुकण्यास नकार दिला. हे बलिदान केवळ धार्मिक नव्हते, तर ते मानवी स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मसन्मानासाठी होते. त्यांच्या या त्यागातून समाजाला धैर्य, निष्ठा आणि मूल्यनिष्ठ जीवनाचा आदर्श मिळतो. आजही त्यांचे जीवन सांगते की, सत्य आणि न्यायासाठी दिलेले बलिदान कधीही व्यर्थ जात नाही.

गुरु गोविंद सिंह यांचे सामाजिक कार्य हे कालातीत आहे. आजच्या आधुनिक समाजातही जातीय भेदभाव, धार्मिक असहिष्णुता, स्त्री–पुरुष असमानता, सामाजिक अन्याय आणि शोषण विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत. अशा वेळी गुरु गोविंद सिंह यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेवर आधारित समाजनिर्मितीचा त्यांचा संदेश आजच्या पिढीसाठी दिशादर्शक ठरतो. वर्तमानपत्रात त्यांच्या जयंतीनिमित्त प्रसिद्ध होणारा लेख हा केवळ इतिहासाची उजळणी नसून समाजाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देणारा असतो. गुरु गोविंद सिंह यांनी दिलेला सामाजिक संदेश आपल्याला सांगतो की, धर्म हा माणसामाणसांमध्ये भिंती उभ्या करण्यासाठी नसून, त्या भिंती पाडण्यासाठी असावा. शक्ती ही दडपशाहीसाठी नव्हे, तर संरक्षणासाठी आणि न्यायासाठी वापरली जावी. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक मानव हा सन्मानास पात्र आहे. २२ डिसेंबर रोजी आपण गुरु गोविंद सिंह यांची जयंती साजरी करताना आपण केवळ धार्मिक विधी आणि समारंभांपुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सामाजिक कार्याचा आशय आत्मसात करणे गरजेचे आहे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांच्या बाजूने उभे राहणे, स्त्री–पुरुष समानतेचा आदर करणे, जात–धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेची कास धरणे, हाच त्यांच्या विचारांना खरे अभिवादन ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन जर आपण न्याय, समता आणि बंधुतेसाठी सतत कार्यरत राहिलो, तरच गुरु गोविंद सिंह यांच्या विचारांचे खरे स्मरण आणि त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य साध्य होईल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान ४ वरून पुढे...

## अंबाजोगाईत 'परिवर्तन'...

विजयासाठी पूरक ठरली. राजकिशोर मोदी यांच्या पराभवामागे सलग २५ वर्षांची सत्ता आणि त्यातून निर्माण झालेली अँटी–इन्कम्बन्सी महत्त्वाची ठरली. भ्रष्टाचाराचे आरोप खोडून काढण्यात त्यांना आलेले अपयश आणि ऐनवेळी सहकाऱ्यांनी सोडलेली साथ यामुळे मोदी यांना फटका बसला. विशेष म्हणजे, राजकिशोर मोदी यांचे सुपुत्र संकेत मोदी यांचा प्रभाग १ मधून झालेला पराभव हा मोदी गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. नगराध्यक्ष पदावर नंदकिशोर मुंदडा यांनी विजय मिळवला असला तरी नगरसेवक पदाच्या निवडणुकीत मात्र राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखालील लोकविकास महाआघाडीने बाजी मारली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

मोदींच्या महाआघाडीचे २० नगरसेवक निवडून आले आहेत, तर मुंदडा गटाला केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागले आहे. २०१६ च्या निवडणुकीत मोदींकडे नगराध्यक्ष पद आणि मुंदडांकडे सर्वाधिक नगरसेवक होते, मात्र यावेळी हे चित्र पूर्णपणे उलट झाले आहे. नगर परिषदेत बहुमत मोदी गटाकडे असल्याने कारभार करताना नंदकिशोर मुंदडा यांना मोठी कसरत करावी लागणार आहे.

## गहिनीनाथ पाचबैल...

राज्यस्तरीय आदर्श पत्रकारीता पुरस्कारासाठी पत्रकार गहिनीनाथ पाचबैल यांची निवड केली या निवडीबद्दल त्यांचे मराठी पत्रकार परिषद बीड,

◆ पान ४ वरून पुढे...

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व पत्रकार संघाचे सदस्य, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व मित्र परीवार, आप्तेष्ठाकडून अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच या पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत १जानेवारी २०२६ रोजी भगवान महाविद्यालय आष्टी होणार आहे.

## आलापुर येथे ...

आहे.या दुःखद घटनेनंतर आलापुर येथे पाण्याच्या टाकीजवळ (ता. माजलगाव, जि. बीड) सांत्वन भेटींसाठी मोठ्या प्रमाणावर मान्यवर येत आहेत. यावेळी विविध क्षेत्रांतील संपादक, पत्रकार, राजकीय पदाधिकारी,

◆ पान ४ वरून पुढे...

शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिनिधी, व्यावसायिक, शेतकरी बांधव, महाराज मंडळी तसेच सर्व स्तरांतील नागरिकांनी फपाळ कुटुंबाची भेट घेऊन आपली श्रद्धांजली अर्पण केली व कुटुंबीयांचे सांत्वन केले. सांत्वन भेटीच्या प्रसंगी उपस्थितांनी कै. मंदिराबाई फपाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या जीवनकार्याबद्दल आदर व्यक्त केला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी फपाळ कुटुंबाला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थनाही व्यक्त केली.

कै. मंदिराबाई फपाळ यांचे निधन ही आलापुर बेलोरा परिसरासाठी मोठी हानी असून, त्यांच्या स्मृती कायम प्रेरणादायी राहतील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

◆ पान ९ वरून पुढे...

## बीडमध्ये क्षीरसागर...

गेलेले डॉ. योगेश क्षीरसागर आणि राष्ट्रवादीचे (शप) आमदार संदीप क्षीरसागर या दोन्ही बंधूंना हा मोठा धक्का मानला जात आहे. या निवडणुकीत शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरणारा थरार पाहायला मिळाला. दहाव्या फेरीपर्यंत भाजपच्या डॉ. ज्योती घुम्रे यांनी आघाडी घेतली होती, मात्र शेवटच्या टप्प्यात प्रेमलता पारवे यांनी मुसंडी मारली. पारवे यांना ३५,८१२ मते मिळाली, तर डॉ. ज्योती घुम्रे ३५,०३३ मतांवर अडकल्या. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या स्मिता वाघमारे यांना २५,४४० मतांवर समाधान मानावे लागले.

## परळीत धनु...

आगामी निवडणुकांमध्ये देखील परळी मतदारसंघात महायुती म्हणूनच आम्ही सामोरे जाऊ असे सूतोवाच करत सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्रातील विजयी...

मेढा नगरपंचायत– रुपाली वारागडे (भाजप)
करमाळा नगरपरिषद– मोहिनी संजय सावंत (करमाळा शहर विकास आघाडी), मलकापूर नगरपंचायत– रश्मी कोठावळे (जनसुराज्य शक्ती पक्ष), हातकणंगले नगरपंचायत– अजितसिंह पाटील (शिवसेना शिंदे गट)
औसा नगरपरिषद– परवीन नवाबुद्दीन शेख (अजित पवार गट)
आटपाडी नगरपंचायत– यु.टी. जाधव (भाजप)
उरण नगरपरिषद– भावना घाणेकर (शरद पवार गट)
पन्हाळा नगरपरिषद– जयश्री पवार (जनसुराज्य शक्ती पक्ष)
तळेगाव नगरपरिषद– संतोष दाभाडे (भाजप)
मुखेड नगरपरिषद– बालाजी खतगावकर (शिंदे गट)
अलिबाग नगरपरिषद– अक्षया नाईक (शेकाप)
म्हसवड नगरपालिका– पूजा वीरकर (भाजप)
फुलंब्री नगरपंचायत– राजेंद्र ठोंबरे (ठाकरे गट)
गंगापूर नगरपंचायत– संजय जाधव (अजित पवार गट)
अंबाजोगाई नगरपरिषद– नंदकिशोर मुंदडा
कळमनुरी नगरपालिका– आश्लेषा चौधरी (शिंदे गट)
वाई नगरपरिषद– अनिल सावंत (भाजप)
जिंतूर नगरपरिषद– प्रताप देशमुख (भाजप)
पालघर नगरपरिषद– उत्तम घरत (शिंदे गट)
तासगाव नगरपरिषद– विजया पाटील (स्वाभिमानी विकास आघाडी)
जेजुरी नगरपरिषद निवडणूक– जयदीप बारभाई (अजित पवार गट)

◆ पान ९ वरून पुढे...

उरूण ईश्वरपूर नगरपरिषद– आनंदराव मलगुंडे (शरद पवार गट)
इंदापूर नगरपरिषद– भरत शाह (अजित पवार गट)
मैंदर्गी नगरपरिषद– अंजली बाजारमठ (भाजप)
मालवण नगरपरिषद – ममता वराडकर (शिंदे गट)
पाचगणी नगरपालिका– दिलीप बगाडे (अजित पवार गट पुरस्कृत)
सावंतवाडी नगरपरिषद– श्रद्धाराजे भोसले (भाजप)
कणकवली नगरपरिषद– संदेश पारकर (शहरविकास आघाडी)
गेवराई नगरपरिषद– गीता पवार (भाजप)
भोर नगरपालिका– रामंचद्र आवारे (अजित पवार गट)
गंगाखेड नगरपरिषद– उर्मिला केंद्रे (अजित पवार गट)
देवळाली प्रवरा नगरपालिका– सत्यजित कदम (भाजप)
अक्कलकोट नगरपरिषद– मिलन कल्याणशेट्टी (भाजप)
रोहा नगरपालिका– वनश्री समीर शेडगे (अजित पवार गट)
धामणगाव नगरपरिषद– डॉ. अर्चना रोठे (भाजप)
विटा नगरपरिषद– काजल संजय म्हेत्रे (शिंदे गट)
वडगांव मावळ नगरपंचायत– अबोली ढोरे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार
पेण नगरपालिका– प्रीतम पाटील (भाजप)
सासवड नगरपालिका– आनंदी जगताप (भाजप)
मंगळवेढा नगरपालिका– सुनंदा बबनराव आवताडे (भाजप)
तुळजापूर नगरपरिषद– पिंटू गांगणे (भाजप)
चिपळूण नगरपरिषद– उमेश सकपाळ (शिंदे गट)
खेड नगरपरिषद– माधवी बुटाला (शिवसेना)
राजापूर नगरपरिषद– हुस्नबानू खलिपे (काँग्रेस)
धर्माबाद नगरपंचायत– संगीता बोलमवार (मराठवाडा जनहित पार्टी)
बिलोली नगरपंचायत– संतोष कुलकर्णी (मराठवाडा जनहित पार्टी)
कुंडलवाडी नगरपंचायत– कोटलवार (भाजप)
डहाणू नगरपरिषद– राजेंद्र माच्छी (शिंदे गट)
फुलंब्री नगरपंचायत – राजेंद्र ठोंबरे (ठाकरे गट)
वैजापूर नगरपालिका– दिनेश परदेशी (भाजप)
पैठण नगरपालिका– विद्या कावसानकर (शिंदे गट)
सिल्लोड नगरपालिका– समीर सत्तार (शिंदे गट)
कन्नड नगरपंचायत– शेखर फरीन बेगम (काँग्रेस)
माथेरान नगरपालिका– चंद्रकांत चौधरी (शिंदे गट)
बुलढाणा नगरपरिषद– पूजा संजय गायकवाड (शिंदे गट)
चांदूर नगर परिषद– प्रियंका विश्वकर्मा (आपलं चांदूर पॅनेल)
खुलताबाद नगरपरिषद– अमेर पटेल (काँग्रेस)
महाबळेश्वर नगरपालिका– सुनील शिंदे (अजित पवार गट)

◆ पान ९ वरून पुढे...

अंबरनाथ नगरपालिका– तेजश्री करंजुले (भाजप)
खोपोली नगरपालिका– कुलदीपक शेंडे (शिंदे गट)
राहुरी नगरपालिका– बाबासाहेब मोरे
कर्जत नगरपालिका– पुष्पा दगडे (अजित पवार गट)
अंबड नगरपालिका– देवयानी कुलकर्णी (भाजप)
तेल्हारा नगरपालिका– वैशाली पालीवाल (भाजप)
देसाईगंज नगरपालिका– लता सुंदरकर (भाजप)
मंगरुळपीर नगरपालिका– अशोक परळीकर (अजित पवार गट)
चाकण नगरपरिषद– मनीषा गोरे (शिंदे गट)
अकलूज नगरपालिका– रेश्मा आडगळे (शरद पवार गट)
मोहोळ नगरपरिषद– सिद्धी वस्त्रे (शिंदे गट)
निलंगा नगरपालिका– संजयराज हलगरकर (भाजप)
लोणावळा नगरपरिषद– राजेंद्र सोनावणे (अजित पवार गट)
दौंड नगरपरिषद– दुर्गादेवी जगदाळे (अजित पवार गट)
शिरुर नगरपरिषद– ऐश्वर्या पाचारणे (अजित पवार गट)
जेजुरी नगरपालिका– जयदीप बारभाई (अजित पवार गट)
आळंदी नगरपालिका– प्रशांत कुराडे (भाजप)
जुन्नर नगरपालिका– सुजाता काजळे (शिंदे गट)
राजगुरुनगर नगरपंचायत– मंगेश गुंडा (शिंदे गट)
वडगाव मावळ नगरपालिका– आबोली ढोरे (अजित पवार गट)
मंचर नगरपालिका– राजश्री गांजले (शिंदे गट)
माळेगाव नगरपालिका– सुयोग सातपुते (अजित पवार गट)
उरुळी फुरसुंगी नगरपालिका– संतोष सरोदे (अजित पवार गट)
रत्नागिरी नगरपरिषद– शिल्पा सुर्वे (शिंदे गट)
श्रीवर्धन नगरपालिका– अतुल चौगुले (ठाकरे गट)
लांजा नगरपंचायत– सावली कुरुप (शिंदे गट)
गुहागर नगरपंचायत– निता मालप (भाजप)
देवरुख नगरपंचायत– मृणाल शेटये (भाजप)
संगमनेर नगरपालिका– मैथिली तांबे (संगमनेर सेवा समिती)
कराड नगरपरिषद– राजेंद्रसिंह यादव (शिंदे गट)
गडचिरोली आरमोरी नगरपरिषद– नगराध्यक्षपदी भाजपचे रुपेश पुणेकर विजयी, देसाईगंज नगरपालिका– नगराध्यक्षपदी भाजपच्या लता सुंदरकर ७४१ मतांनी विजयी
दर्यापूर नगरपालिका – काँग्रेसच्या मंदा भारसाकळे विजयी
मोर्शी नगरपालिका – प्रतीक्षा गुल्हाने, शिवसेना शिंदे गट विजयी
नांदगाव खंडेश्वर नगरपालिका – प्राप्ती मारोडकर, शिवसेना ठाकरे गट विजयी, चिखलदरा नगरपालिका – काँग्रेसचे शेख अब्दुल शेख हैदर

◆ पान ९ वरून पुढे...

विजयी, धारणी नगरपालिका – भाजपचे सुनील चौथमल विजयी
वरूड नगरपालिका – भाजपचे ईश्वर सलामे विजयी
शेंदूरजना घाट नगरपालिका – भाजपच्या सुवर्णा वरखेडे विजयी
चांदूर बाजार नगरपालिका – बच्चू कडू यांच्या प्रहारच्या मनीषा नांगलिया विजयी, अकोट नगरपालिका : माया धुळे (भाजप)
हिवरखेड नगरपालिका– सुलभा दुतोंडे (भाजप)
बाळापूर नगरपालिका– डॉ. आफरीन (काँग्रेस)
बार्शीटाकळी नगरपंचायत– अख्तरा खातून (वंचित बहुजन आघाडी)
फलटण नगरपालिका– समशेरसिंग निंबाळकर (भाजप)
पाचगणी नगरपालिका– दिलीप बगाडे (अजित पवार गट)
बारामती नगरपालिका– सचिन सातव (अजित पवार गट)
मंचर नगरपालिका– राजश्री गांजळे (शिंदे गट)
अहमदपूर नगरपरिषद निवडणूक– स्वप्निल व्होते (भाजप)
बदलापूर नगरपरिषद– रुचिता घोरपडे (भाजप)
श्रीवर्धन नगरपालिका– अतुल चोगले ( ठाकरे गट)

## परळी नगर...

निवडणुकीत आखलेली रणनीती, संघटनात्मक ताकद आणि कार्यकर्त्यांची मोट बांधण्याची क्षमता यामुळे शिवसेनेला निर्णायक यश मिळाले. या निवडणुकीच्या अनुषंगाने माझी मंत्री धनंजय मुंडे साहेब व पंकजाताई मुंडे यांचे शिवसेनेला सहकार्य झाले. या निवडणुकीत जयश्री गीते यांना निवडणुकीपूर्वीच बिनविरोध निवडून आणण्यात मुळूक यांना यश मिळाले होते. रविवारी जाहीर झालेल्या निकालात शिवसेनेचे व्यंकटेश शिंदे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवत विरोधकांचा पराभव केला. दोन जागांवरील या विजयामुळे परळीतील राजकीय समीकरणांवर जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे वर्चस्व अधोरेखित झाले असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेना अधिक बळकट झाल्याचे चित्र आहे. या निकालामुळे सचिन मुळूक यांचे नेतृत्व पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

## धारूर नगरपरिषद...

विजयी झाले आहेत. धारूर नगरपरिषद निवडणुकीत नामदार पंकजाताई मुंडे व प्रकाश सोळंके यांनी लक्ष घातले होते आमदार प्रकाश सोळुंके यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती या निवडणुकीमध्ये आता धारूर नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वर्चस्व राहिले आहे. वीस पैकी तब्बल ११ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाकडेआल्या आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जेजुरीत भीषण दुर्घटना; खंडोबाच्या पायरीवर भंडाऱ्याचा भडका, नव्या नगरसेविकांसह १६ जण गंभीर

**पुणे । प्रतिनिधी**

जेजुरीत मतमोजणी संपल्यानंतर विजयी जल्लोषाला शोकाची छाया पडेल, अशी धक्कादायक घटना जेजुरीत घडली. खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीवर भाविक व कार्यकर्त्यांनी भंडारा अर्पण करताना अचानक भीषण भडका उडून किमान १६ जण गंभीर भाजल्याची घटना दुपारी सुमारे ३ वाजता घडली. जखमींमध्ये दोन नव्याने निवडून आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेविकांसह अनेक महिला, तरुणांचा समावेश आहे.

घटनेनंतर परिसरात मोठी दहशत निर्माण झाली. क्षणभरात भंडाऱ्याने पेट घेतला आणि जोरदार आवाजासह स्फोट होऊन आजूबाजूचे लोक होरपळले. भाजलेल्या जखमींना तातडीने जेजुरीतील खाजगी तसेच शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींना पुढील उपचारासाठी पुण्यात हलविण्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे.

मल्हार नाट्यगृहात मतमोजणी पूर्ण होऊन निकाल जाहीर होताच राष्ट्रवादी काँग्रेसचे विजयी उमेदवार, समर्थक व कार्यकर्ते खंडोबाच्या दर्शनासाठी गडाच्या पहिल्या पायरीवर गेले होते. येथे भाविकांनी मोठ्या प्रमाणावर भंडारा उधळताना वापरलेल्या भंडाऱ्याने अचानक



पेट घेतला. अत्यंत ज्वालाग्राही घटक मिश्रित असल्यामुळे भडका एकदम मोठा झाला आणि अनेक जण त्यात सापडले. स्फोटासारखा आवाज झाल्यानंतर क्षणात परिसर धुराने व्यापला. काही काळासाठी तिथे प्रचंड घबराट पसरली होती.

घटना अतिदुर्दैवी, भेसळयुक्त भंडाऱ्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे नव्या नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी सांगितले. निवडून आलेले नगराध्यक्ष जयदीप बारभाई म्हणाले, गडाच्या पहिल्या पायरीवर घडलेली दुर्घटना अतिशय दुर्दैवी आहे. ज्वालाग्राही आणि भेसळयुक्त भंडाऱ्याचा वापर झाल्यामुळे भडका उडाल्याची स्पष्ट शक्यता आहे. पुढील काळात शहरात विक्री होणाऱ्या अशा भेसळयुक्त भंडाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल. नगरपालिका यासाठी विशेष पथक उभारणार आहे.

सुमारे आठ महिन्यांपूर्वी माजी प्रमुख विश्वस्त शिवराज झगडे यांनी मुंबईत अन्न व औषध भेसळ प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची भेट घेऊन जेजुरीतील भेसळयुक्त भंडाऱ्याविरुद्ध कडक कारवाईची मागणी केली होती. त्या मागणीने मोठी खळबळ माजली होती. तथापि, प्रशासनाने केवळ आदेश जारी केले पण प्रत्यक्षात ठोस कारवाई झाली नव्हती, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## दागिन्यांसह तरुणाचे फोटो पाहिले, मित्रांनी प्लॅन बनवला, एक किलो सोन्यावरुन ब्लॅकमेल, उच्चशिक्षित आरोपींनी नेमकं काय केलं?

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

तुम्ही १ कोटी रुपयांच्या सोन्याची स्मगलिंग केली असून तुमच्याविरोधात सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे, अशी भीती दाखवली आणि पोलिस असल्याची थाप मारून अल्पवयीन मुलाकडून एकूण अडीच लाख रूपये किंमतीचे सोन्याच्या दागिने खंडणी स्वरूपात घेतल्याचा प्रकार समोर आली . या प्रकरणात छत्रपती संभाजीनगरमधील जवाहरनगर पोलिसांनी वेदांत राजकुमार राठोड (वय २२, रा. तिसगाव ता. खुलताबाद, ह.मु. दत्त मंदिर, बंजारा कॉलनी), गौरव ज्ञानेश्वर धनवडे (वय २१,




रा. आरडा तोलाजी ता. मंठा जि. जालना, ह.मु. साई सारा कॉलनी, बजाजनगर) आणि अमित मनोहर महतो (राजपुत) (वय २३) या तिघांना ताब्यात घेतले आहे. तर रोहन सुनिल उगले, तेजस्वी विजय पवार हे फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात मनोज जर्नादन चौधरी (वय ४६, रा. शिवशंकर कॉलनी) यांनी जवाहरनगर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या १७ वर्षाच्या मुलाला आरोपींनी भीती दाखवत सांगितलं की, तुमच्या घरात एक किलो सोने आहे. तुमच्या विरोधात सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल आहे. तुम्हाला अटक होईल. हे प्रकरण मिटवण्यासाठी खंडणीखोरांनी अल्पवयीन मुलाकडून ३ तोळे २१ ग्रॅमचे सोन्याचे गंठण, तसेच १६ ग्रॅम वजनाचे गहुपोत असे सोन्याचे दागिने खंडणी स्वरूपात घेतले. या प्रकरणात खंडणी घेणाऱ्या गौरव धनवडे, वेदांत राजकुमार राठोड, तेजस्वी विजय पवार, अमित महतो, तसेच रोहन सुनिल उगले या पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.


दैनिक मराठवाडा पत्र — दि. २०/१२/२०२५

**CHANGE IN NAME**

I Declaration by this Publication about change in my name
**Old name: Rekha Laxman Choudhari**
**New name: Rekha Laxmanrao Choudhari**
Present address: Shinde nagar, Canol road. Beed.
Dist. Beed. Maharashtra. Mob.no 9860667037


### जाहिर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १८६० / २०२५**
**कौशल्या विरूध्द निरंक**

अर्जदार १. कौशल्या भ्र. अनंता लोखंडे, वय – ७३ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नेकनुर, ता. जि. बीड, २. शकुंतला भ्र. भागवत भटे, वय – ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोनपेठवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अनंता हरिभाउ लोखंडे यांचा मृत्यु झाला, यांचे

वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांचा मृत्यु दिनांक २७/०९/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा क्र. १ व २ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क्र. १ व २ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अनंता हरिभाऊ लोखंडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९ / १२ / २०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०१/२०२६ आहे.

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८९८/२०२५**

अर्जदार– १) मधुकर पि. नारायण नागरगोजे, वय ६१ वर्षे, धंदा–शेती, रा. वडगांव (गुंधा) ता. जि. बीड. २) सुधाकर पि. नारायण नागरगोजे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वडगांव (गुंधा) ता. जि. बीड. (३) सुबाबाई भ्र. अशोक चोले, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकी देवळा ता. वडवणी, जि. बीड. (४) विमल भ्र. रामराव खेडकर, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. चकलंबा, ता. गेवराई जि. बीड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे नारायण पि. मल्हारी नागरगोजे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे नारायण पि. मल्हारी नागरगोजे, रा. वडगांव गुंधा, ता. जि. बीड हया दिनांक ०५/०९/२०२३ रोजी मौजे वडगांव गुंधा येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ व ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताची पत्नी नामे गवुबाई भ्र. नारायण नागरगोजे या दिनांक २५/०३/२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच मयताचे आई वडील हे ब–याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक २०/ ०१ / २०२६

आज दिनांक १८ / १२ / २०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

(ॲड. खाडे एस. बी. यांच्यामार्फत)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क .स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १८६५/२०२५**

१.सौ. उषा भ्र. सुरेश पंडीत, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि. बीड.२. सौ. आशा भ्र. प्रकाश अतकरे, वय ६८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड. ३.सौ. कविता भ्र. राजेंद्र रावताळे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोणी वारणी ता. शिरुर कासार, जि.बीड, सौ. सविता भ्र. सुरेश पंडीत, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि.बीड, ५.सौ. मिरा भ्र. नाना रावताळे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी नाका, बीड, ता.जि.बीड, ६.सिताबाई अनिल राउत, वय सज्ञान वर्षे, धंदा – घरकाम,रा. डोंगरकिन्ही, ता. पाटोदा, जि.बीड,

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे साहेबराव भाउ काळे हे / हया दिनांक १६/०१/२०१५ रोजी राहते घरी पिंपळवाडी ता.जि.बीड येथे व मयत नामे सुंदराबाई साहेबराव काळे हया दिनांक ०९/०४/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– १५/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख: २३/०१/२०२६

( मार्फत विधिज्ञ:– ॲड डी डी मस्के )

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा.श्री. कृष्णराव के. पाटील २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८७०/ २०२५**
**अरुणाबाई वि. निरंक**

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार:१) अरुणाबाई भ्र. रघुनाथ कांबळे, वयः ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळनेर, ता. जि. बीड, २) रामेश्वर पि. रघुनाथ कांबळे, वयः ५३ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ३) परमेश्वर पि. रघुनाथ कांबळे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे, ४) मंगल भ्र. दशरथ घेणे, वयः ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरील प्रमाणे

विरुध्द निरंक

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे रघुनाथ बापुराव कांबळे, राहणार पिंपळनेर, ता. जि. बीड हे दिनांक १३/०८/२०२५ रोजी राहत्या घरी पिंपळनेर ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क्र. १ हया मयतांची पत्नी असुन अर्जदार क. २ व ३ हे मयतांचे मुले आहेत तर अर्जदार क. ४ ही मयताची मुलगी आहे.

मयत नामे रघुनाथ बापुराव कांबळे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहु सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत रघुनाथ बापुराव कांबळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.सदर प्रकरणात पुढील तारीख २२/०१/२०२६ आहे.

आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

( विधीज्ञ श्री. गणेश घुगे)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १९०६/२०२५**
**विमल लक्ष्मण खरात व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :– १. विमल प्र. लक्ष्मण खरात, वय – ६८ वर्षे, धंदा–घरकाम, रा. हिवरपहाडी, ता. जि. बीड, २. भागवत पि. लक्ष्मण खरात, वय – ३६ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर, ३. दत्तात्रय पि. लक्ष्मण खरात, वय – ३२ वर्षे, धंदा–शेती, रा. सदर ४. नारायण पि. लक्ष्मण खरात, वय–२७ वर्षे, धंदा– घरकाम, रा. सदर

गैरअर्जदार :– निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत लक्ष्मण नारायण खरात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत लक्ष्मण नारायण खरात यांचा मृत्यु दिनांक ३१.०८.२०२५ रोजी राहते घरी हिवरापहाडी ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ ते ४ हे त्यांचे मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार मदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लक्ष्मण नारायण खरात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ४ फेब्रुवारी २०२६

(ॲड. जी एस घुगे यांच्यामार्फत)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही. व्ही.जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९४६/२०२५**
**आश्रुबा पि. बप्पासाहेब तावरे व इतर वि. निरंक**

अर्जदार–१. आश्रुबा पि. बप्पासाहेब तावरे, वय – ६१ वर्षे, धंदा–व्यापार, रा. स्वराज्य नगर, दक्षिण बाजु, बलगुजार, बीड ता.जि.बीड, २. मेघा भ्र. हनुमंत तावरे, वय– ४५ वर्षे, धंदा – घरकाम रा. खडकी घाट ता. जि. बीड, ३.आशिष पि. हनुमंत तावरे, वय– २६ वर्षे, धंदा–खाजगी नौकरी, रा. विद्यानगर (पूर्व), सहयाद्री हॉटेलच्या जवळ, बीड ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

प्रकरण: भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत कलावती भ्र. बप्पा तावरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत कलावती भ्र. बप्पा तावरे हया दिनांक १०/०९/२०२५ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची सुन तर ममताची सुन तर अर्जदार क्र. ३ हा मयताचा नातु आहे. मयताचे पती बप्पा बाबु तावरे हे दिनांक ०४.०५.२०२० रोजी मयत झालेले आहेत. मयतास अजुन एक मुलगा नामे हनुमंत बप्पासाहेब तावरे हा होता, तो दिनांक २१.०५.२०१५ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र. २ ही त्याची पत्नी असुन अर्जदार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे कलावती भ्र. बप्पा तावरे रा.बीड ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील तारीख १३ /०२/२०२६.

आज दिनांक १९/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(ॲड. ए. व्ही. मेहेत्रे यांच्यामार्फत )

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहीर प्रगटन

**तहसील कार्यालय, गेवराई ता. गेवराई, जि.बीड (दंड विभाग)**
e-mail -tahsildar georai2@gmail.com
दिनांक ०३.१२.२०२५
दुरध्वनी क्र. ०२४४७–२६२१४५ क्र.२०२५/दंड/कावि–

प्रती,
१. पोलीस निरीक्षक, पो.स्टे तलवाडा
२. ग्राम महसूल अधिकारी आंतरवाली बू

विषय:– मृत्यूनोंद आदेश मिळणे बाबत.

संदर्भ :– १. शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ ईऑ९९१११८१)/प्र.क्र२२/कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५

२. अर्जदार रविंद्र महादेव पवार रा. विजयनगर तांडा आंतरवाली बू ता. गेवराई जि.बीड यांचा अर्ज दिनांक २७.१०.२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रकरणात संदर्भ क्र ०२ नूसार अर्जदार रविंद्र महादेव पवार रा. विजयनगर तांडा आंतरवाली बू ता. गेवराई यांनी अर्ज देवून अर्जदार यांचे भाऊ विजयकुमार महादेव पवार यांचा मृत्यू दिनांक १९.०५.१९९६ रोजी विजयनगर तांडा आंतरवाली बू ता. गेवराई जि.बीड येथे करावयाचे राहून गेल्याने प्रकरणात मृत्यू आदेश मिळणे बाबत या कार्यालयाससंदर्भीय अर्जाव्दारे विनंती करण्यात आलेली आहे.

करीता उक्त अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक जम्रनों२५२५/ ईऑ९९१११८१)/प्र.क्र२२/ कु.क नविन मंत्रालय मुंबई दिनांक १२.०३.२०२५ नूसार प्रकरणात पो.स्टे गेवराई यांना कळविण्यात येते की, अर्जदाराचे स्थानीक मृत्यू ठीकाणचा व रहीवासीचा तपास करून पोलीस निरीक्षक यांनी चौकशी अहवाल सादर करावा, तसेच ग्राम महसूल अधिकारी आंतरवाली बू यांनी अर्जदाराचे स्थानीक रहीवासीचा स्थानीक चौकशी/पंचनामा करून वस्तूस्थीतीदर्शक अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्का — (स्वाक्षरीत) तालुका दंडाधिकारी, गेवराई

### जाहिर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १३०५ / २०२४**
CNR No. MIB3102000026332024
**अंबिका एकनाथ भोसले व इतर १ वि. निरंक**

अर्जदार :– १. अंबिका भ्र. एकनाथ भोसले, वय–५० वर्ष, धंदा घरकाम व शेती, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड २. एकानाथ पि. भानुदास भोसले, वय–५५ वर्ष, धंदा–शेती, रा. पिंपळवाडी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ व २ यांनी या न्यायालयात मयत गणेश पि. एकनाथ भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गणेश पि. एकनाथ भोसले यांचा मृत्यु दिनांक २१/०२/२०२४ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ हि मयताची आई असून अर्जदार क. २ हे मयताचे वडील आहेत. मयत हा मृत्युसमयी अविवाहीत होता. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत गणेश पि. एकनाथ भोसले यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक समर्थ राजयोग मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २७/०१/२०२६

आज दिनांक १७ माहे डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(मार्फत ॲड. एम. ए. गडकर)

आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८७१/२०२५**
**पद्मीनीबाई भ्र. बन्सी शिंदे वि. निरंक**

मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदारः १. पद्मीनीबाई भ्र. बन्सी शिंदे, वय ७७, धंदा घरकाम, रा. हिवरापहाडी ता. जि. बीड २. मंगल भ्र. बाळु तुरे, वय ५०, धंदा घरकाम, रा. येवली सोलापुर ता. जि. सोलापुर ३. सुशालाबाई भ्र. श्रीरंग मारकड, वय ४४, धंदा घरकाम, रा. विष्णु नगर, छ. संभाजीनगर ४. भाउसाहेब पि. बन्सी शिंदे, वय ४३, धंदा शेती, रा. हिवरापहाडी, ता.जि.बीड ५. उषा भ्र. बाबासाहेब शेळके, वय ४९, धंदा घरकाम, रा. कृष्णा नगर, खेड जि. सातारा ६. महादेव पि. बन्सी शिंदे, वय ४०, धंदा शेती, रा. हिवरापहाडी, ता. जि. बीड ७. बाळु पि. बन्सी शिंदे, वय ३८, धंदा शेती, रा. हिवरापहाडी, ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी मयत नामे बन्सी पि. भाऊ शिंदे, राहणार हिवरापहाडी ता. जि. बीड हे दिनांक ०३/०९/२०२४ रोजी जिल्हा रुग्णालचय बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयत बन्सी पि. भाऊ शिंदे यांची पत्नी असून, अर्जदार क. २,३, ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत तसेच अर्जदार क. ४,६ व ७ हे मयताचे मुले आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत. मयत नामे बन्सी पि. भाऊ शिंदे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत बन्सी पि. भाऊ शिंदे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०१/२०२६ आहे.

आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

आदेशावरून (स्वाक्षरीत) स.अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

### जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १८६५/२०२५**

अर्जदार : १. सौ. उषा भ्र. सुरेश पंडीत, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि. बीड, २. सौ. आशा भ्र. प्रकाश अतकरे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड, ३. सौ. कविता भ्र. राजेंद्र रावताळे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोणी वारणी ता. शिरुर कासार, जि.बीड, ४. सौ. सविता भ्र. सुरेश पंडीत, वय ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. खडकपुरा, बीड, ता.जि.बीड, ५. सौ. मिरा भ्र. नाना रावताळे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी नाका, बीड, ता.जि.बीड, ६. सिताबाई अनिल राउत, वय सज्ञान वर्षे, धंदा घरकाम, रा. डोंगरकिन्ही, ता. पाटोदा, जि. बीड.

विरुध्द निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे साहेबराव भाउ काळे हे / हया दिनांक १६/०१/२०२५ रोजी राहते घरी पिंपळवाडी ता.जि.बीड येथे व मयत नामे सुंदराबाई साहेबराव काळे हया दिनांक ०९/०४/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– १५/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:– २३/०१/२०२६

( मार्फत विधिज्ञ ॲड डी डी मस्के )

आदेशावरून (स्वाक्षरीत) स.अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर बीड
शिक्का — (स्वाक्षरीत) क. लिपीक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# दैनिक मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २२ डिसेंबर २०२५ ● पान ४

## सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन!

### ● माजलगाव नगरपरिषद

माजलगाव नगरपरिषद
प्रभाग ०१
अ) सरोदे रेखा प्रल्हादराव (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब) यादव शरद रामभाऊ (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)
प्रभाग ०२- अ) शेख इम्रान शेख बशीर (रराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)
ब) जावळे उज्वला सचिन (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
प्रभाग ०३- अ) राज सय्यद अहेमद नूर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब) नाजिया जुनेद पठाण (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
प्रभाग ०४- अ) दीपक जालिंदर मेंडके (भाजप), ब) रेश्मा दीपक मेंडके (अपक्ष)
प्रभाग ०५
अ) राहुल सुखदेव लंगडे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब) सुचिता भारतराव होके (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)
प्रभाग ०६- अ) लतीफ दिवाण सय्यद (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब) गंगाबाई भागवत भोसले (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार)
प्रभाग ०७- अ ) विजय राजेभाऊ शिंदे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब ) वैशाली प्रशांत शेटे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
प्रभाग ०८- अ) सहाल अमेरबीन चाऊस (रराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)
ब) तहूरा मुज्जमील पटेल (अपक्ष)
प्रभाग ०९- अ) महेमूद हबीब कुरेशी (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब) आयशाबानू फारूक अत्तार (अपक्ष)
प्रभाग १०- अ) इम्रान आगा खान (रराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), ब) नीला गोविंदराव इतापे (रराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार)
प्रभाग ११- अ) मतीन अहेमद शेख (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब) फरहद ईद्रीस शेख (एम. आय.एम )
प्रभाग १२- अ) सय्यद रफिक अली (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी )
ब) सुलोचना मरिबा प्रधान (राष्ट्रीय काँग्रेस)
प्रभाग १३- अ) उषा अशोक लांडगे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) ब) रेहाना हारून शेख (रराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

### ● गेवराई नगरपरिषद

नगराध्यक्षपदी भाजपच्या गीताभाभी पवार विजयी
प्रभाग क्र. १
अ) बेदरे गंगुबाई त्र्यंबकराव (भाजप) - विजयी
ब) राजेश नारायण टाक (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. २
अ) प्रशांत महादेव राख (भाजप) - विजयी
ब) मडके राधिका सोपान (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ३
अ) भाले ज्ञानेश्वर अशोक (भाजप) - विजयी
ब) बागवान जकिराबी सलाउद्दीन (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ४
अ) घोडके संगीता दादासाहेब (राष्ट्रवादी - अजित पवार गट) - विजयी
ब) शाहरुख खान ताजखान पठाण (राष्ट्रवादी - अजित पवार गट) - विजयी
प्रभाग क्र. ५
अ) कविता एकनाथ लाड (भाजप) - विजयी
ब) घुंबर्डे रेवती भगवान (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ६
अ) महेश मधुकर सौदरमल (भाजप) - विजयी
ब) आसिया शफिओद्दीन सय्यद (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ७
अ) सुमित्रा नाना थोरात (भाजप) - विजयी
ब) कानगुडे आप्पासाहेब विठ्ठल (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ८
अ) सुतार सोनाली सुभाष (भाजप) - विजयी
ब) शाहेदाद सादेक शेख (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. ९
अ) धोंडलकर अंकिता भरत (भाजप) - विजयी
ब) राक्षसभुवनकर राजेंद्र राधाकृष्णराव (भाजप) - विजयी
प्रभाग क्र. १०
अ) संभाहरे रेणुका शिवलिंग (राष्ट्रवादी - अजित पवार गट) - विजयी
ब) शेख खाजा कठुमिया (राष्ट्रवादी - अजित पवार गट) - विजयी
अंतिम पक्षनिहाय निकाल (Total Seats):
भाजप - १६ जागा
राष्ट्रवादी (अजित पवार गट) - ४ जागा

### ● धारुर नगरपरिषद

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब रामराव जाधव ६६६ मताधिक्याने विजयी (घड्याळ), २० पैकी ११ नगरसेवक राष्ट्रवादी घड्याळाचे, भाजपाचे ६ तर तुतारीचे ३
प्रभाग क्रमांक १ -विजय उमेदवार
बालाजी चव्हाण (कमळ), निर्मला नेहरकर (कमळ)
प्रभाग क्रमांक २- विजय उमेदवार
नितीन शिनगारे (घड्याळ), सारिका शिरसाट (कमळ)
प्रभाग क्रमांक ३- विजय उमेदवार
मनीषा सोनवणे (तुतारी), शेख अक्रम (तुतारी)
प्रभाग क्रमांक ४- विजय उमेदवार
बिबीशन गायकवाड (तुतारी), आकांक्षा फावडे (घड्याळ)
प्रभाग क्रमांक ५- विजय उमेदवार
रोहित हजारी (कमळ), माधुरी लोकरे (कमळ)
प्रभाग क्रमांक ६- विजय उमेदवार
सय्यद बानोबी शौकत अली (घड्याळ), सय्यद हारून रौफ (घड्याळ)
प्रभाग क्रमांक ७- विजय उमेदवार
संगीता भावठाणकर (घड्याळ), कुरेशी आवेज (घड्याळ)
प्रभाग क्रमांक ८- विजय उमेदवार
सुप्रिया सचिन जाधव (घड्याळ), गणेश सावंत (घड्याळ)
प्रभाग क्रमांक ९- विजय उमेदवार
विनायक शिनगारे (कमळ ), अश्विनी गायके (घड्याळ)
प्रभाग क्रमांक १०- विजय उमेदवार
लक्ष्मणराव शिरसाट (घड्याळ), नीतू सुजित वैरागे (घड्याळ)

# अंबाजोगाईत 'परिवर्तन': नंदकिशोर मुंदडा नगराध्यक्षपदी

## राजकिशोर मोदींचा नगरपालिकेत प्रथमच पराभव

### माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे, मनोज लखेरा सारंग पुजारी यांच्यासह संकेत मोदी पराभूत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

नगर परिषद निवडणुकीच्या निकालात मोठा फेरबदल पाहायला मिळाला असून भारतीय जनता पक्ष पुरस्कृत शहर परिवर्तन जनविकास आघाडीचे उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांनी नगराध्यक्ष पद काबीज केले आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या लढतीत मुंदडा यांनी २२ हजार ७७७ मते मिळवून आपले प्रतिस्पर्धी राजकिशोर मोदी यांचा पराभव केला. राजकिशोर मोदी यांना २० हजार २८० मते मिळाली असून मुंदडा यांनी पहिल्या फेरीपासून घेतलेली



आघाडी शेवटच्या सहाव्या फेरीपर्यंत कायम राखली. सहाव्या फेरीअखेर जवळपास २ हजार ५१० मतांचे मताधिक्य घेत नंदकिशोर मुंदडा विजयी झाले आहेत.

या विजयाचे खऱ्या अर्थाने शिल्पकार अक्षय मुंदडा आणि आमदार नमिता मुंदडा ठरले आहेत. निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच अक्षय मुंदडा यांनी शहराच्या विकासाचा मुद्दा मांडत प्रचाराची सूत्रे आपल्या हाती घेतली होती. त्यांनी नगर परिषदेच्या मागील काळातील भ्रष्टाचाराची प्रकरणे पुराव्यासह मतदारांसमोर मांडली, ज्याचा मोठा परिणाम निकालावर दिसून आला. नंदकिशोर मुंदडा यांनी ही आपली शेवटची निवडणूक असल्याचे सांगत मतदारांना भावनिक साद घातली होती, तर दुसरीकडे आमदार नमिता मुंदडा यांच्या माध्यमातून झालेली रस्ते आणि नळयोजनेची कामे, घरकुल योजनेचा लाभ आणि शासनाची 'लाडकी बहीण' योजना मुंदडा यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● निवडणुकातील धक्कादायक पराभव

**या निवडणुकीत अंबाजोगाईच्या मतदारांनी अनेक प्रस्थापित आणि मातब्बर नेत्यांना घरचा रस्ता दाखवत मोठा राजकीय धक्का दिला आहे. सर्वात धक्कादायक पराभव प्रभाग १ मधून राजकिशोर मोदी यांचे सुपुत्र संकेत मोदी यांचा झाला असून, त्यांची ही पहिलीच निवडणूक होती. प्रभाग ८ मधून तीन वेळा नगरसेवक आणि माजी उपनगराध्यक्ष राहिलेले बबनराव लोमटे यांनाही पराभवाचा सामना करावा लागला आहे. तसेच प्रभाग ७ मधून माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा आणि दिलीप काळे या दिग्गजांना मतदारांनी नाकारले आहे. प्रभाग ३ मधून माजी उपनगराध्यक्ष सारंग पुजारी यांचा झालेला पराभवही शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. या मातब्बर नेत्यांच्या पराभवामुळे शहरात बदलाची लाट स्पष्टपणे दिसून आली आहे.**

## लिंबागणेश वाणीवस्तीवर बिबट्याचा धडक हल्ला; शेळी ठार, परिसरात भीतीचे वातावरण : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील वाणीवस्ती परिसरात मध्यरात्री बिबट्याने घुसखोरी करत बाबुराव वाणी यांच्या गोठ्यातील एका शेळीवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण वाणीवस्ती तसेच आजूबाजूच्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. घटनेचा सविस्तर तपशील असा की, वाणीवस्ती येथील बाबुराव वाणी यांचे एकत्रित कुटुंब असून घरासमोर असलेल्या गोठ्यात गायी, म्हशी आणि शेळ्या बांधलेल्या होत्या. मध्यरात्री सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास गोठ्यात जनावरांची धडपड सुरू झाल्याने बाबुराव वाणी यांना जाग आली. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता





काही जनावर पळताना दिसले. बॅटरीच्या प्रकाशात पाहणी करत असताना एका शेळीचा नरडा तोडलेला असून मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले दिसले. याचवेळी बॅटरीच्या प्रकाशात समोरच बिबट्या उभा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. प्रकाश पडताच बिबट्या तात्काळ पळून गेला. या घटनेनंतर वाणीवस्ती व परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा वावर असल्याच्या भीतीने अनेक ग्रामस्थांनी रात्र जागून काढली. लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांमध्ये विशेषतः भीती असून नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळले आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना अयोध्या वाणी म्हणाल्या, आम्ही शेतात राहतो. आमच्या अंगणात लहान मुले खेळत असतात. कुटुंबातील पुरुष कामानिमित्त बाहेर जातात. रात्री बिबट्याने शेळी ठार केल्यामुळे आम्हाला मोठी भीती वाटत आहे. वनविभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा. दरम्यान, वनविभागाने पिंजरे लावून तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे. गेल्या आठवड्यात लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्यामुळे डॉ. ढवळे यांच्या मागणीनुसार वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांसोबत बैठक घेऊन जनजागृती केली होती. डॉ. ढवळे यांनी पुढे सांगितले की, परिसरात ड्रोनद्वारे शोध मोहीम राबवावी, पिंजरे लावावेत, तसेच गस्त वाढवावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी वनविभागाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून सुरक्षिततेची हमी द्यावी.

## सौ.के.एस.के. महाविद्यालयात श्री.संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या हस्ते श्री.संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर म्हणाले की, श्री.संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला. महाराजांनी तेरा दिवसात संत तुकारामाच्या गाथेचे पुर्नलेखन केले.त्यामुळे लोकांना त्यांचे कौतुक वाटू लागले. तुकारामाची गाथा,शंकर दिपीका, प्रकाश दीप, घाण्याचे अभंग, तैलसिंधु अशा अनेक ग्रंथाची रचना केली.संत तुकारामांचे पट्टशिष्य समाजाचे आराध्य दैवत,समाज सुधारक असे थोर संत श्री.संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात येत आहे.त्यांचा जन्म ८ डिसेंबर १६२४ मध्ये पुणे जिल्हयातील सुदूंबरे (पुणे) या गावी झाला.

## गहिनीनाथ पाचबैल यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पञकारीता पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**



शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे आष्टी येथील भगवान महाविद्यालय (कला, वाणिज्य, विज्ञान) महाविद्यालयाच्या वतीने आयोजित गंगाई बाबाजी कला रौप्य महोत्सव २०२५-२०२६अंतर्गत गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पञकारीता पुरस्कार दैनिक झुंजारनेताचे पत्रकार गहिनीनाथ पाचबैल यांना शुक्रवार दिनांक १९/१२/२०२५ रोजी आयोजन समितीच्यावतीने जाहीर करण्यात आला आहे. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे सचिव असलेले गहिनीनाथ पाचबैल हे गेल्या पंचवीस वर्षापासून मराठवाड्याचे मुखपत्र असलेल्या दैनिक झुंजारनेता या वृत्तपत्राच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्राबरोबरच समाजातील अनेक घटकांना न्याय देण्यासाठी लेखणीच्या माध्यमातून आवाज उठवून अनेक प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केला आहे तसेच पीडीतांचे प्रश्न मार्गी लावले आहेत याचीच दखल घेत आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित गंगाई बाबाजी कला रौप्य महोत्सव आयोजक समितने ▶▶ उर्वरित पान २ वर



*राष्ट्रसंत गाडगे महाराज यांना अभिवादन करतांना ॲड. गोविंद शिराळे पाटील. ॲड. सुधीर जाधव. शितल राऊत.. संतोष पवार. महिंद्र वाघमारे. प्रवीण साळुंखे. संतोष भालेकर जिजा शिंदे. मनोज नवले आदि उपस्थीत होते.*

## आलापुर येथे मंदिराबाई फपाळ यांच्या निधनाने शोककळा; मान्यवरांच्या सांत्वन भेटी



**माजलगाव । प्रतिनिधी**

दि २२/१२/२०२५ सोमवार रोजी मंदिराबाई दामोधर फपाळ यांचा दशक्रिया विधी ( दहाव्याचा ) कार्यक्रम मंजरथ ता माजलगाव जी बीड येथे होणार आहे तरी पाहुणेमंडळी व मित्रमंडळी यांनी नोंद घ्यावी

माजलगाव तालुक्यातील आलापुर (बेलोरा) येथील ज्येष्ठ पत्रकार व विकासनामा साप्ताहिकाचे संपादक बालासाहेब दामोधर फपाळ यांच्या मातोश्री कै. मंदिराबाई दामोधर फपाळ यांचे दिनांक १८ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फपाळ कुटुंबावर तसेच संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे. कै. मंदिराबाई फपाळ या स्वभावाने प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ व संस्कारक्षम होत्या. कुटुंबसंस्कार जपणाऱ्या या मातृशक्तीच्या जाण्याने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला आहे. त्यांच्या पश्चात पुत्र,मुलगी सून, नातवंडे असा परिवार ▶▶ उर्वरित पान २ वर

## धामणगाव उपबाजार पेठ शुभारंभास शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे: सभापती रमजान तांबोळी

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, कडा अंतर्गत धामणगाव येथे उभारण्यात आलेल्या उपबाजार पेठेचा भव्य शुभारंभ सोहळा सोमवार दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा.लोकनेते आ.सुरेश धस यांच्या शुभ हस्ते धामणगाव येथे उपबाजार पेठ आवारात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमास शेतकरी,व्यापारी, ग्रामस्थ व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कडा कृ.उ.बा.समिती



सभापती रमजान नूरमहंमद तांबोळी यांनी केले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. साहेबरावजी दरेकर, माजी आमदार आष्टी/पाटोदा/शिरूर



विधानसभा मतदारसंघ राहणार असून उद्घाटन आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते होणार आहे. या शुभारंभ प्रसंगी बद्रिनाथ जगताप, संजय गाढवे एन. टी. गर्जे, संजना रावसाहेब गाढवे, अशोक गर्जे, बंडु तळेकर, ॲड.साहेबराव म्हस्के, संजय महाजन, खंडू हाके,दिपक पवळ, दत्ताभाऊ काकडे ,विकास पवार, प्रल्हाद मुळीक, संजय चितळे, शांतीलाल भोसले, मोहन आमटे,नंदकिशोर करांडे,शत्रुघ्न मरकड, रमेश तांदळे,भरत भवर, लक्ष्मण नन्नवरे,दत्तात्रय खोटे, ज्योतीबा महाडीक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या उपबाजार पेठेमुळे धामणगाव व परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी जवळची, सुसज्ज व पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध होणार असून शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी ही उपबाजार पेठ मैलाचा दगड ठरणार असल्याचे सभापती रमजान तांबोळी यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सभापती रमजान नूरमहंमद तांबोळी, उपसभापती नामदेव आनंदराव धोंडे व सचिव हनुमंत किसन गळगटे उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.यावेळी संचालक मंडळातील संजय ढोबळे, अशोक पवार, राम मधुरकर, संजय मेहेर, मधुकर सायंबर, अण्णासाहेब लांबडे, राजेंद्र गव्हाणे, मुरलीधर फसले, पंडित पोकळे, रामदास शेंडगे, बाबासाहेब शेकडे, राजू हुलगे, जयश्री तळेकर, छायाबाई अशोक लगड,वंदना गायकवाड,बेबीनंदा नागरगोजे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथील सर्व कर्मचारी वृंद उपस्थित राहणार आहे. या सोहळ्याला शेतकरी, व्यापारी, ग्रामस्थ व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन शेवटी सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.